Volume - 7 (2026)
Special Issue - 1 (January)

**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

ISSN
2582-9173

# आकाशवाणीचे योगदान आणि मराठी साहित्य

**डॉ. संजय जीवनलाल सिंगनजुडे**
विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स,
३१०-ब, न्यू नंदनवन, नागपूर, ४४००२४.
भ्रमणध्वनी क्रमांक : ९७६६९६२७२४
ई-मेल : sanjayssinganjude@gmail.com

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i1.88

---

***सारांश :***

*लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून प्रसारमाध्यमाची ओळख आहे. एकोणिसावे शतक औद्योगिक क्रांतीचे शतक असून या शतकात मुद्रण कलेचा विकास होऊन मुद्रित प्रसार माध्यमांना वेग प्राप्त झाला. तर माहिती व तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यम जन्माला आले. तंत्रज्ञानात झालेल्या प्रगतीमुळे प्रसार माध्यमांना आधुनिक स्वरूप प्राप्त झाले. समाजा आरसा म्हणून प्रसारमाध्यमाकडे बघितले जाते. समाजातील प्रत्येक घटना टिपून तिला समाजाच्या अंतिम घटकापर्यंत पोचवण्याचे कार्य प्रसारमाध्यम करीत असतात. प्रसारमाध्यम माहिती प्रसारणाचा व्यवसाय करीत असतात. व्यवसाय हा शब्द या माहिती प्रसारणातून अर्थार्जनाची साखळी जोडली गेलेली आहे. तसेच ज्ञान, व्यवसाय, संवाद, मनोरंजन, प्रबोधन या अनुषंगाने वृत्तपत्र, दूरसंचार, नभोवाणी, संगणक, इंटरनेट या माध्यमातून प्रत्येक व्यक्ती आज जगाशी जोडला गेलेला आहे. आकाशवाणीने भारतीय सांस्कृतिक इतिहासात महत्त्वाचे योगदान दिले आहे. मराठी समाजाला आकाशवाणी हे माहिती किंवा मनोरंजन करणारे माध्यमच नव्हते; तर ते भाषिक संस्काराचे संस्कृती संवर्धनाचे आणि साहित्यप्रसार करण्याचे प्रमुख साधनही होते. आकाशवाणीच्या आगमनाने विविध मराठी साहित्य प्रकारांना एक व्यासपीठ मिळाले. त्यातून कवी, लेखकांचे साहित्य विचार, कविता, कथा, कादंबरी, नाटक, अनुवादित साहित्य थेट घराघरापर्यंत पोहोचवणारे माध्यम आकाशवाणी ठरले.*

**बीज शब्द :** प्रसार माध्यम, आकाशवाणी, रेडिओ, मराठी साहित्य, ज्ञान, व्यवसाय, मनोरंजन, प्रबोधन, बहुजन हिताय बहुजन सुखाय.

---

**प्रस्तावना** :

प्रसारमाध्यमाला समाजात घडणाऱ्या विविध घटनांवर नजर ठेवणारा 'तिसरा डोळा' संबोधले जाते. तसेच लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून प्रसारमाध्यमाची ओळख आहे. समाजात घडणाऱ्या विविध घटनांचे चित्रीकरण करून तात्काळ सामाजिक माध्यमांवर टाकल्या जातात. तसेच त्यावर जनतेकडून प्रतिक्रिया मिळतात. त्यामुळे

चुकीच्या गोष्टींवर अंकुश ठेवण्याचे एक साधनही प्रसारमाध्यमांना मानले जाते. तर समाजाचा विकासामध्ये प्रसारमाध्यमांच्या सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे लोकशाहीचा आधारस्तंभ म्हणूनही त्याच्याकडे पाहता येते. प्रसारमाध्यमांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन घडवलेले दिसते. प्रसारमाध्यमांद्वारे संवाद क्रांती होऊन जग अगदी जवळ आलेले आहे. माहितीचे आदानप्रदान अगदी घरबसल्या सोयीस्करपणे केले जाऊ शकते. भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात प्रसारमाध्यमांचा मोलाचा वाटा आहे. जनमत, देशभक्ती, स्वाभिमान, वैचारिक दृष्टिकोन, देशभावना जनमाणसात जागृत करण्यात प्रसारमाध्यमांनी महत्त्वपूर्ण भूमिका दिसून येते. प्राचीन मध्ययुगीन काळात कीर्तन, भजन, दवंडी ही प्रसार माध्यमे अस्तित्वात होती. तर आधुनिक काळात औद्योगिक क्रांतीमुळे जग जवळ आले आणि नवनवीन प्रसार माध्यमांचा उगम झाला. त्यात मुद्रण कला विकसित झाली. वृत्तपत्र, रेडिओ अर्थात आकाशवाणी, दूरदर्शन ही प्रसारमाध्यमे निर्माण झाले. तर सद्यस्थितीत एकाविसाव्या शतकात आधुनिक तंत्रज्ञानाचा विकासामुळे इंटरनेट, मोबाईल, फेसबुक, इंस्टाग्राम इत्यादी अनेक प्रकारच्या प्रसार माध्यमांचा उगम झालेला दिसतो. या प्रसार माध्यमांमुळे समाजाला मनोरंजन, उद्बोधन, प्रबोधन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले या सर्व प्रसार माध्यमांमध्ये श्राव्य माध्यम म्हणून आकाशवाणी-नभोवाणीचे वेगळे महत्त्व आहे. प्रस्तुत लेखात प्रसार माध्यम म्हणून आकाशवाणी या प्रसार माध्यमाचे स्वरूप, विस्तार, योगदान आणि कार्यप्रणाली तसेच मराठी साहित्याच्या आणि साहित्यिकांच्या प्रसिद्धीकरिता आकाशवाणीचे योगदान मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**आकाशवाणीचे स्वरूप, विस्तार व योगदान :**

एकोणिसावे शतक औद्योगिक क्रांतीचे शतक असून या शतकात मुद्रण कलेचा विकास होऊन मुद्रित प्रसार माध्यमांना वेग प्राप्त झाला. तर माहिती व तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यम जन्माला आले. तंत्रज्ञानात झालेल्या प्रगतीमुळे प्रसार माध्यमांना आधुनिक स्वरूप प्राप्त झाले. ग्रॅहम बेलने दूरध्वनीचा शोध १८७६ मध्ये लावला. त्यामुळे तारेच्या माध्यमातून शब्द एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी ऐकला गेला. या पुढचे पाऊल म्हणजे १८९५ ला 'मार्कोनी' या इटालियन शास्त्रज्ञाने 'बिनतारी संदेश यंत्रणे'चा शोध लावला. त्या शोधामुळे माणसाचा शब्द नद्या, नाले, समुद्र, डोंगर, दऱ्या, राने, वने इत्यादीअडथळे ओलांडून हजारो मैल ऐकता येणे शक्य झाले. याच क्रांतिकारी वैज्ञानिक तत्त्वाचा वापर रेडिओ प्रसारणात करण्यात येतो. या रेडिओचा उपयोग करून जर्मनी, इटली सारख्या देशांनी आपले तत्वज्ञान आणि मते लोकांवर बिंबवण्यासाठी केला. तसेच रशियात देखील रेडिओ प्रेषण हे सांस्कृतिक क्रांतीचे हत्यार म्हणून वापरण्यात आले. भारतात देखील इंग्रजी अमलात स्वातंत्र्य चळवळीकरिता देशभक्तांनी रेडिओचा प्रभावीपणे उपयोग केला होता. भारतात रेडिओ या शब्द ऐवजी आकाशवाणी हा शब्द उपयोगात आणला गेला आणि आज तो रूढ अर्थाने वापरला जातो. आकाशवाणी हे भारतात सर्व स्तरावर पोचणारे प्रसारमाध्यम आहे. म्हणूनच लोकशिक्षण, लोकप्रबोधन, ज्ञानप्रसार, मनोरंजन, समाज संस्कृतीचे संवर्धन, देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, प्रचारप्रसाराकरिता आकाशवाणी या माध्यमाचा प्रभावीपणे उपयोग करण्यात होतो. आकाशवाणी सर्व दूर खेडे भागात पोहोचलेले आहे. त्यामुळे साहित्याविषयी माहिती आकाशवाणीच्या अनुषंगाने सर्व दूर पोहचली. त्याच्या परिणाम स्वरूप साहित्याची आवड जनमानसात निर्माण करणारे तसेच समाजाला आनंद देणारे संस्कार करणारे माध्यम म्हणून आकाशवाणीचा उल्लेख करता येते.

आज दूरदर्शनच्या विविध वाहिन्यांचा सार्वत्रिक प्रभावातही आकाशवाणीचे कार्यक्रम सुरू आहेत. पंतप्रधान मोदींनी 'मन की बात' या कार्यक्रमाचे प्रसारणाकरिता आकाशवाणीची निवड केली. यावरूनही आकाशवाणीचे महत्त्व सहजपणे लक्षात येते.

**आकाशवाणीचे ब्रीदवाक्य :**

आकाशवाणीचे ब्रीदवाक्य 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे आहे. या ब्रीदवाक्यातील सूत्रानुसार आकाशवाणी सामाजिक बांधिलकी स्वीकारून बहुजनांच्या हिताचे आणि सुखाचे कार्यक्रम, मनोरंजनाचे कार्यक्रम प्रसारित करून बहुजनांना हसत खेळवत माहिती, ज्ञान, मनोरंजन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. समाजासाठी उपयुक्त आणि दर्जेदार कार्यक्रम देणे ही आकाशवाणी करिता कसोटी असते त्यात विविध कार्यक्रमांचा समावेश आहे.

**ज्ञान आणि मनोरंजनाचे स्त्रोत :**

आकाशवाणी 'लोकविद्यापीठ' म्हणून कार्य पाहते. त्यात लोकांच्या आवडीनिवडी जोपासल्या जातात. याकरिता आकाशवाणी वेगवेगळ्या प्रकारचे ज्ञान शिक्षण लोकांना देत असते. त्याकरिता आकाशवाणीत शिक्षण विभाग असतो. त्यात संगीत विभाग हा सर्वात मोठा विभाग आहे. त्या विभागाला आकाशवाणीचा आत्मा संबोधले जाते. या विभागाद्वारे नवनवीन गाणी ऐकवली जाते. संगीताच्या मदतीने ध्वनिमुद्रित करून ऐकवली जातात. याशिवाय सिनेमातील संगीत भक्ती गीते, भावगीते आणि इतर गाण्यासंबंधीत प्रकार यांच्या समावेश असतो. या सर्व प्रकारच्या गाण्याचा संग्रह सी.डी. स्वरूपात असतो. याचा लाभही श्रोतृवर्गाला दिला जातो.

याशिवाय नाटक विभागातर्फे श्रोत्यांना दर्जेदार नाटके, लघुनाटिका ऐकवल्या जातात. समाजाला प्रबोधन करण्यासाठी कसदार दर्जेदार नाटक ऐकविण्याची प्रथा नाटक या कार्यक्रमातून आकाशवाणीवर प्रसारित करण्याची प्रथा आजही कायम आहे

भाषण हा आकाशवाणीचा आणखी एक महत्त्वाचा विभाग आहे. यातून समाजाची ज्ञानात्मक भूक भागविले जाते. या विभागात विविध विषयावर भाषण, संभाषण, मुलाखती, सल्लामसलतीचे आयोजन केले जाते. रोजचा नवीन विषय हाताळल्यामुळे आकाशवाणीवर प्रकाशित होणारे कार्यक्रम नाविन्यपूर्ण असतात.

श्रोत्यांना चालू घडामोडी, घटनांची माहिती, बातमी विभागाद्वारे दिली जाते. त्याकरिता बातमी विभाग तत्पर असतो. बातमी मिळविण्यासाठी बातमीदार टेलिप्रिंटर, फॅक्स, पत्राद्वारे प्रत्यक्ष कार्यक्रमास हजर राहून बातमी प्राप्त करतात व ती बातमी निवेदकामार्फत लोकांपर्यंत पोहोचवली जाते.

वरील विभागाशिवाय ग्रामीण विभाग हा आणखी एक महत्त्वपूर्ण विभाग मानला जातो. त्याद्वारे शेतकऱ्यांना शेतीविषयक माहिती दिली जाते. त्यात शेतीविषयक सल्ला, शेती उत्पादन वाढविण्यासाठी आणि शेतकरी समाजाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी तसेच बी-बियाणे, मातीची सुपीकता वाढविणारे विविध

कार्यक्रम, कृषीतज्ज्ञांचे कार्यक्रम आयोजित केली जातात. याशिवाय त्यांच्या मनोरंजनासाठी लोकसंगीत, लोकनाट्य सारखे कार्यक्रम प्रसारित केले जातात. ग्रामीण कार्यक्रम हा आकाशवाणीचा महत्त्वाचा घटक आहे. याशिवाय आकाशवाणीत युगवाणी विभाग हिंदी कार्यक्रम विभाग, बालविभाग, महिला कार्यक्रम विभाग, क्रीडा विभाग, कामगार विभाग, संस्कृत विभाग असे लहानलहान विभाग ही कार्यरत असतात. हे विभाग आपापल्या क्षेत्रातील विविध अंगी कार्यक्रम प्रसारित करण्याचे कार्य करतात. याशिवाय भाषण, माहिती, मुलाखत, चर्चा, संवाद, निवेदन, वृत्तांत, टिप्स अशा प्रकारची कार्यक्रम आकाशवाणीवरून प्रसारित केले जातात.

**आकाशवाणीची सुरुवात :**

रेडिओची निर्मिती होण्यास काही घटक महत्त्वाचे आहेत. त्यात रेडिओ तरंगाची निर्मिती व त्याद्वारे माहिती प्रेषण करणे; याकरिता जे. सी. मॅक्सवेल, ए. एस. पपॉव्ह, हेंरिक हर्टझ, गुग्लीमो मार्कोनी इत्यादी अनेक शास्त्रज्ञांचे तांत्रिक व सैद्धांतिक संशोधन महत्त्वपूर्ण ठरले. या शास्त्रज्ञांच्या कार्यकर्तेमुळे तयार झालेल्या रेडिओने जगभरात आपले वेगळे स्थान निर्माण केले. ब्रिटनमध्ये सण १९२३ ला 'ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कंपनी'ची स्थापना झाली. या कंपनीने जगभरात रेडिओ केंद्राचा विस्तार करून विविध ठिकाणी रेडिओ केंद्राची निर्मिती केली. भारतात आकाशवाणीचे आगमन २३ जुलै १९२३ मध्ये झाले. मुंबई येथे 'बॉम्बे ब्रॉडकास्टिंग कंपनी'ची स्थापना झाली. पुढे याच केंद्राचे 'ऑल इंडिया रेडिओ' असे नामकरण करण्यात आले. ती पुढे १९५७ पासून 'आकाशवाणी' या नावाने प्रचलित झाले.

**रेडिओचा अर्थ :**

- ' रेडिओ' ह्या शब्दाचा नेमका अर्थ काय हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.
- ' रेडिओ म्हणजे ध्वनी ग्रहण यंत्र होय.'
- ' रेडिओ दूरचे भाषण, गायन इत्यादी ऐकण्याचे साधन होय.'
- 'विद्युत चुंबकीय तरंगांच्या सहाय्याने आवाज व संगीत विश्वभरात पोहोचविणारे माध्यम म्हणजे रेडिओ होय.'
- 'रेडिओ केवळ श्राव्य माध्यम होय.'

'रेडिओ प्रेषण हे एकमार्गी संदेशवहन प्रस्थापित करणारे साधन आहे. त्यात केवळ ध्वनीचे प्रेषण होत असते. तर दूरदर्शन मध्ये दृश्य आणि ध्वनी या दोन्हीचे अर्थात दृकश्राव्य असे संयुक्तरित्या प्रेषण होत असते.

वरील व्याख्यान वरून रेडिओचा अर्थ विद्युत चुंबकीय तरंगाच्या साह्याने आवाज निर्मिती होऊन ती ध्वनीच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविणारे एक माध्यम आहे, असे म्हणता येईल.

**आकाशवाणीचा विस्तार :**

आकाशवाणीने भारतात प्रवेश केल्यावर आजअखेर तिचा विस्तार वाढत गेलेला दिसतो. आकाशवाणी हे प्रसार भारतीच्या अंतर्गत येणारे जगातील सर्वात मोठे रेडिओ नेटवर्क मानले जाते. २०२१ पर्यंत भारतात आकाशवाणीचे ४८९ केंद्र होती. त्यात ६६२ ट्रान्समीटर च्या साह्याने ही केंद्रे आपले कार्यक्रम प्रसारित करीत होते. प्रसार भारतीच्या डिसेंबर २०२५ च्या आकडेवारीनुसार भारतात आकाशवाणीची एकूण ५९१ प्रसारण केंद्रे कार्यरत आहेत. हे केंद्रे देशाच्या सुमारे ९२ टक्के क्षेत्रफळ आणि ९९.१९% लोकसंख्येला सेवा प्रदान करतात. या ५९१ केंद्रापैकी २३० केंद्रांवर स्टुडिओ सुविधा आहेत. जेथे मूळ कार्यक्रम तयार केले जातात. तर ३६१ केंद्रे रिले केंद्रे म्हणून काम करतात. भारतात आकाशवाणी २३ प्रमुख भाषा आणि १७९ बोलीभाषांमध्ये कार्यक्रम प्रसारित करते. तसेच विदेशी सेवा विभागामार्फत १९ भारतीय भाषा आणि १५ परदेशी भाषांच्या साहाय्याने १०८ देशांमध्ये आकाशवाणी आपले कार्यक्रम प्रसारित करते. हे आकाशवाणी वरून प्रसारित होणारे कार्यक्रम इन्सॅट-१ (डी), इन्सॅट (ए), इन्सॅट-२ (बी) या उपग्रहांच्या माध्यमातून केले जात आहेत. आज जगभरातील लोक आकाशवाणी वरील कार्यक्रम 'News On Air' या ॲपच्या सहाय्याने आणि फेसबुक पेज तसेच आकाशवाणीच्या संकेतस्थळाच्या माध्यमातून जगभरात पाहता येतात.

आकाशवाणीचे प्रमुख कार्य तिच्या ब्रीदवाक्यानुसार 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' असे आहे. त्यानुसार ते लोकांना माहिती देणे, ज्ञान देणे, मनोरंजन करणे, प्रबोधन करणे, लोकांची माहिती अद्यावत ठेवणे, शिक्षण देणे, सामाजिक सांस्कृतिक संस्कार करणे ही असून आकाशवाणीला 'लोकविद्यापीठ' म्हटले तर यात गैर होणार नाही.

प्रसार माध्यमांमध्ये वृत्तपत्र, दूरदर्शन, आकाशवाणी, इंटरनेट, लोकपरंपरा यामध्ये आकाशवाणी या माध्यमाचे वेगळे स्थान आहे. आकाशवाणीने सांस्कृतिक दृष्ट्या भारतातच नव्हे तर विदेशातही सेवा देण्याचे कार्य केले करीत आहे. यात पश्चिम आशियाई देशात आफ्रिकन देशात ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड युरोपीय देशासह भारतीय उपखंडात ऑल इंडिया रेडिओचे वास्तव राष्ट्राच्या अभिमानाचा विषय असल्याचे डॉ. नम्रता कदम यांनी आपल्या 'मराठी साहित्य प्रसार आणि आकाशवाणी' या ग्रंथात मांडले आहे. यावरून ऑल इंडिया रेडिओची व्यापकता लक्षात येते. आकाशवाणीने लहान मुले, युवक, महिला, प्रौढ अशा विविध वयोगटातील तसेच विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या घटकांसाठी कामगार सभा, मुलाखती, वनिता मंडळ, बाल दरबार, युगवाणी, यासारखे कार्यक्रम प्रसारित केले. त्यांना मनोरंजनाबरोबरच ज्ञानाने समृद्ध करण्याचे महत्त्वपूर्वक कार्य केले.

**मराठी साहित्य आणि आकाशवाणी :**

साहित्यप्रसारक्षेत्रातही आकाशवाणीचे मोलाचे योगदान आहे. आकाशवाणीवरून सकाळी प्रसारित होणारे भूपाळी, भक्तीगीत, भावगीत, लोकगीत व देशभक्तीपर गीतांद्वारे लोकांच्या मनात भक्ती, देशभावना जागृत होते. मराठी साहित्यातील गदिमा, कुसुमाग्रज, ग्रेस, सुरेश भट, वंदना विटणकर, विठ्ठल वाघ अशा सुप्रसिद्ध कवींचे गाजलेली गाणी सुद्धा आकाशवाणीवर प्रसारित झाली व गाजली. 'अरे संसार संसार', 'बुगडी माझी सांडली गं', 'माळयाच्या मळयामंदी पाटाचं पाणी वाहत', 'विठ्ठला तू वेडा कुंभार', 'उषःकाल होता होता काळरात्र झाली', 'माणुसकीच्या शत्रुसंगे युद्ध आमचे सुरु', 'बाळा जो जो रे', 'गे माय भू तुझे मी' यासारख्या

लोकप्रिय गीतांना ऐकून दोन-तीन पिढ्यांचे कर्ण तृप्त झालेले आहे. एवढेच नव्हे तर आकाशवाणीमुळे हृदयनाथ मंगेशकर, श्रीनिवास खुडे, वसंत पवार, जितेंद्र अभिषेकी, डॉ. वसंत देसाई, विश्वनाथ मोरे आदी अनेक संगीतकारांचे संगीत विश्वातील योगदान तसेच विठ्ठल शिंदे, प्रमिला दातार, रवींद्र साठे, सुधीर फडके, रामदास कामत, सुरेश वाडकर, माणिक वर्मा, भीमराव पांचाळे, अनुराधा पौडवाल अशा सर्व गायन प्रकारातील गायकांना ओळख मिळाली. त्यांची ख्याती लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्यात आकाशवाणीचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.

आकाशवाणीने मराठी लेखकांनाही ओळख मिळवून दिली. आकाशवाणीच्या माध्यमातून मराठी साहित्य लोकांपर्यंत पोहचले. पु.भ. लाड व्याख्यानमालेचे आयोजन, पु. ल. देशपांडे यांचे साहित्य प्रसारित केले गेले. या यादीत न. र. फाटक, प्रा. पेंडसे, वि.भी. कोलते, प्रा गं.भा. सरदार अशा नामवंत साहित्यिकांचा समावेश होतो. तसेच महत्त्वाच्या लेखकांचा मुलाखतीचा वृत्तांत, परिसंवाद व परिचर्चा यांचे आयोजन, पुस्तकाचा आढावा, आकाशवाणीद्वारे घेण्यात आलेला आहे. आकाशवाणीवरील सादर केलेल्या कार्यक्रमातून आकाशवाणीच्या इतिहास बघता कार्यकर्तृत्वाने अनेक लेखक कलावंत लोकप्रिय ठरलेले आहे.

आकाशवाणीने भारतीय सांस्कृतिक इतिहासात महत्त्वाचे योगदान दिले आहे. मराठी समाजाला आकाशवाणी हे माहिती किंवा मनोरंजन करणारे माध्यमच नव्हते; तर ते भाषिक संस्काराचे संस्कृती संवर्धनाचे आणि साहित्यप्रसार करण्याचे प्रमुख साधनही होते. आकाशवाणीच्या आगमनाने विविध मराठी साहित्य प्रकारांना एक व्यासपीठ मिळाले. त्यातून कवी, लेखकांचे साहित्य विचार, कविता, कथा, कादंबरी, नाटक, अनुवादित साहित्य थेट घराघरापर्यंत पोहोचवणारे माध्यम आकाशवाणी ठरले. आकाशवाणीच्या अविष्कारामुळे मराठी माणसाला आपल्या साहित्य अनुभवाला श्राव्यरूप देणारे आणि प्रसार करणारे प्रमुख साधन बनले.

मराठी साहित्य समृद्ध आहे. या परंपरेत लोकसाहित्य, कविता, कथा, नाटक, कादंबरी, प्रवासवर्णाने, ललितलेख यांचे प्रमुख स्थान आहे. आकाशवाणी वरून कवींनी स्वतःच्या आवाजात कविता सादर केल्याने कवी थेट लोकांपर्यंत पोहोचले. यामुळे शांता शेळके, बहिणाबाई, विंदा करंदीकर, कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर, वसंत बापट, फ. मु. शिंदे, गदिमा, ग्रेस, सुरेश भट, विठ्ठल वाघ, यासारख्या कवींच्या कविता जनसामान्यांपर्यंत पोहोचल्या. एवढेच नाही तर कवितेतील आरोह, अवरोह, कवितेतील लयता तसेच शब्दांच्या ध्वनीतून प्रकट होणारा अर्थ, भावना आणि आशय हे सर्व विशेष आकाशवाणीमुळे घराघरात पोहोचली. आकाशवाणीने मराठी लोकसाहित्याचे जतनाची कार्य केलेले आहे. त्यात अभंग, भारुड, ओव्या, लोकगीते, पोवाडे तसेच प्रादेशिक बोलीभाषेतील विविध कार्यक्रम प्रसारित केले. बालसाहित्य कार्यक्रमालाही महत्व दिले.

आकाशवाणीचे फायदे असे की या माध्यमातून लेखक, कवी, गायक, कलावंत यांना लोकप्रियता मिळते. 'काव्यं यशसे अर्थकृत्ये' यासारखे प्रयोजन आकाशवाणीला लागू पडतात. कारण या माध्यमातून कीर्ती आणि अर्थप्राप्ती हे प्रयोजन साध्य करता येतात. आकाशवाणी वरील प्रसारित होणारे कार्यक्रम साक्षर तसेच निरक्षर लोकही ऐकतात. त्यामुळे आकाशवाणी वरील मराठी साहित्य प्रसारणामुळे निरक्षर लोकातही रसिकता निर्माण होण्यास मदत होते. लहान मुलांवर नीतिमत्तेचे संस्कार होतात. रसिकाचे भाषिक कौशल्य विकसित होण्यास मदत होते. महिलांचे तसेच प्रौढांचे अनेक विषयांसंबंधी प्रबोधन होते.

**समारोप :**

आकाशवाणी हे प्रसार माध्यमाचे श्राव्य साधन आहे. इथे केवळ ध्वनीला महत्त्व असतो. आकाशवाणीत वरील वक्ता हा श्रोत्यांना बघू शकत नाही. त्याचा श्रोत्यांशी एकतर्फी संवाद सुरू असते. तेव्हा समोरच्या श्रोत्यांशी संवाद साधत आहोत असा स्वरात वक्त्याला आपले बोलणे करावी लागते. आकाशवाणीवर केवळ वाचिक अभिनय, भाषाशैली यांच्या जोरावरच भाषण रंगवावे लागते. तसेच निवेदकाची भाषा ही ओघवती, अचूक उच्चार आणि भावनिकता यावर आधारित असणे आवश्यक आहे. आकाशवाणीवर विविध स्तरातील लोकांची दखल घेऊन कार्यक्रम सादरीकरणावर भर असतो. आजच्या डिजिटल युगातही आकाशवाणीचे महत्त्व कमी झालेले नाही. आकाशवाणीची प्रसारण केवळ मनोरंजनापुरती सीमित नसून एक संस्कारक्षम आणि साहित्य संवर्धन करणारे सर्जनशील कार्य करणारे माध्यम आहे. आकाशवाणीने मराठी लोकसाहित्याचे जतनाची कार्य केलेले आहे. त्यात अभंग, भारुड, ओव्या, लोकगीते, पोवाडे तसेच प्रादेशिक बोलीभाषेतील विविध कार्यक्रम प्रसारित केले. बालसाहित्य कार्यक्रमालाही महत्व दिले. अनेक साहित्यिकांना आणि त्यांच्या साहित्याला जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आकाशवाणीने केलेले दिसते. तसेच प्रमाण भाषेचा वापर, योग्य शब्द प्रयोग, लयबद्ध भाषा प्रवाह यामुळे आकाशवाणी एक प्रकारे भाषाशुद्धीचे केंद्र बनली. आकाशवाणीने जनमानसात आपले स्थान निश्चित केली आहे आणि भविष्यातही नवनवीन माध्यमाच्या सहाय्याने जे अस्तित्व कायम राहील, असे म्हणणे वावगे होणार नाही.

**निष्कर्ष :**

1. रेडिओचा अर्थ विद्युत चुंबकीय तरंगाच्या साह्याने आवाज निर्मिती होऊन ती ध्वनीच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविणारे एक माध्यम आहे.
2. आकाशवाणीने आजच्या डिजिटल युगातही आपले स्थान कायम ठेवले आहे.
3. आकाशवाणीने केवळ मनोरंजन करण्याचे काम न करता ज्ञान, प्रबोधन, सांस्कृतिक संस्कार करण्याचे कार्यही केले.
4. मराठी साहित्याच्या वाटचालीत आकाशवाणीने लेखक आणि त्यांचे साहित्यकृती यांना प्रकाशात आणून जनमानसात पोहोचवून लेखकांना आणि त्यांच्या साहित्यकृतीला ओळख प्राप्त करून दिली.
5. आकाशवाणीने साहित्य क्षेत्राला लोकाभिमुख बनवले. तसेच बालसाहित्याला देखील नवे व्यासपीठ प्राप्त करून दिले.
6. आकाशवाणीने आपल्या प्रत्येक कार्यक्रमाला समाजातील अंतिम घटकापर्यंत पोहोचवून त्यांच्यावर संस्कार करण्याचे कार्य केले. म्हणून आकाशवाणीला 'लोकविद्यापीठ' म्हणणे गैर होणार नाही.

**संदर्भ :**


- शेळके भास्कर, संपादक - 'प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०१२.

- कदम नम्रता - ‘मराठी साहित्य प्रसार आणि आकाशवाणी’, अविष्कार पब्लिकेशन
- जोशी श्रीपाद भालचंद्र - 'जागतिकीकरण संवाद माध्यमे आणि फेरमांडणीचे नवे आव्हान', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.
- भटकर सुधीर - 'प्रसार माध्यमे आणि समाज', अर्थव पब्लिकेशन